ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख १३ ऑगस्ट, १९५२ | अंक १३

## विविध माहिती

**सिंद्री कारखान्याचें उत्पादन**— सिंद्री येथील खताच्या कारखान्याचें दैनिक उत्पादन कारखान्यांत होऊं शकणाऱ्या उत्पादनाच्या निम्म्यानें आतां होऊं लागलें आहे आतांपर्यंत कारखान्यांत ७६,३४४ टन खत उत्पन्न झालें. इतकें अमोनिअम सल्फेट आयात करण्यास सुमारें २·७ कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ लागली असती, तेवढी वांचली.

**मुक्या-बहिऱ्यांच्या खेळाच्या स्पर्धा**— ऑगस्ट, १९५३ मध्यें बेल्जममध्यें मुक्या व बहिऱ्या खेळाडूंच्या ऑलिंपिक स्पर्धा भरविण्यांत येणार आहेत. दिल्ली येथील बहिऱ्या-मुक्यांसाठी काढण्यांत आलेली संस्था वरील स्पर्धेत भाग घेण्यासाठी अशा खेळाडूंना शिक्षण देण्याची व्यवस्था करीत आहे.

**बंगालच्या कवीला मदत**—बंगालमधील प्रसिद्ध कवि काझी नझरूल इस्लाम ह्यांना मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणखात्याकडून २,००० रुपयांची देणगी देण्यांत आली आहे. पं. नेहरू ह्यांनींही त्यांना २५० रुपयांची देणगी दिली असून दरमहा १०० रुपये एक वर्षभर देऊं केले आहेत काझींची प्रकृति हल्ली बरी नसते.

**फोर्ड फौंडेशनची मदत**—भारतांत शेतीचें शिक्षण देणारीं केंद्रें स्थापन करण्यासाठी अमेरिकेच्या फोर्ड फौंडेशननें मदत देऊं केली आहे. मदतीच्या रकमेंत आणखी वाढ करण्यांत आल्यामुळें भारतामधील प्रत्येक राज्यांत एक, ह्याप्रमाणें अशीं २५ केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत असें समजतें.

**खास तिकिटांमुळें झालेलें उत्पन्न**— भारत स्वतंत्र झाल्यापासून निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्तानें ७ वेळां पोस्टाचीं खास तिकिटें काढण्यांत आलीं ह्या तिकिटांमुळें भारतीय सरकारला २,०२,६४,६११ रुपयांची प्राप्ति झाली. १९५० सालीं प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानें काढण्यांत आलेल्या तिकिटांपासून ६२,४६,१५२ रुपये मिळाले व १९४८ सालीं काढण्यांत आलेल्या गांधी-स्मारक तिकिटांपासून ५८,१८,९०२ रुपये मिळाले.

**गादीवरून खाली उतरलेले राजे**— १९३६ सालापासून दहा देशांच्या राजांनीं आपल्या गाद्या सोडल्या आहेत. ते राजे अगर राण्या पुढीलप्रमाणें:— ब्रिटनचे आठवे एडवर्ड १९३६, बेल्जमचे राजे लिओ पोल्ड १९४१, हॉलंडची राणी विल्हेमिना १९४८. १९३९ सालानंतर रुमेनिआचा राजा मायकेल, अल्बेनिआचा राजा झॉग, युगोस्लाव्हिआचा राजा पीटर दुसरा, बल्गेरिआचा राजा सिमे ऑन, इटलीचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल, व त्याचा मुलगा अंबर्टो ह्यांनीं राज्यत्याग केला. इजिप्तचे राजे फरूक हे ह्या मालिकेंतील १० वे राजे आहेत. इराणचे शहा अकरावे ठरण्याचा संभव आहे.

**काजूंचा तुटवडा**— क्लिॉन मधील काजूंचें संस्करण करणाऱ्या १३० कारखान्यांना कच्च्या काजूंचा तुटवडा पडण्याचा संभव दिसत आहे. गेल्या वर्षीच्या हंगामांत आफ्रिकेहून ६०,००० टन काजू आयात करण्यांत आले होते. चालू हंगामांत ५२,००० टनांचीच आयात झाली आहे. जरूर ती आयात न झाल्यास १०० कारखाने ऑगस्ट अखेर बंद होतील.

**थडग्याऐवजीं पिरॅमीड बांधा**—१९४८ सालीं न्यूयॉर्क येथें मिस फ्लॉरेन्स ग्रॉफ नांवाची एक बाई ९१ वर्षांची होऊन परलोकीं गेली. तिनें आपलें मृत्युपत्र करून ठेवून मरणोत्तर आपल्या थडग्याऐवजीं पिरॅमिड बांधण्यांत यावी अशी इच्छा प्रदर्शित केली होती. तिच्या नातेवाईकांनीं ह्या तरतुदीस विरोध केला. पण कोर्टानें बाईची इच्छा पुरी करण्यासाठी १०,००० डॉलर्स खर्च करण्यांत यावे असा हुकूम केला. ह्या बाई पुष्कळ वर्षांपूर्वी इजिप्तला गेल्या असतां पिरॅमिड पाहून त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला होता.

**उत्तर प्रदेशाचें १९५१-५२ चें अंदाजपत्रक**— उत्तर प्रदेश सरकारचे १९५१-५२ सालचे हिशोब आतां पूर्ण झाले असून त्यावर्षीं राज्याला खर्चापेक्षां १८ लाख रुपये उत्पन्न अधिक झालें, असें आढळून आलें आहे. त्या सालचें दुरुस्त अंदाजपत्रक तयार करण्यांत आलें होतें तेव्हां ५७·०६ कोटी रुपये उत्पन्न होईल आणि तेवढाच खर्च होईल, असें वाटलें होतें.

**चंबळेवरील धरणासाठी कर्ज**— भारताच्या पंचवार्षिक विकास कार्यक्रमांत चंबळ नदीवरील धरणाचा समावेश करण्यांत आला आहे असें समजतें. ह्या धरणासाठी ४० कोटी रुपये लागणार असून मध्यवर्ती सरकार धरणासाठी ५ ते ७ कोटी रुपयांचें कर्ज उभारण्याचा विचार करीत आहे. धरणामुळें वीज उत्पन्न होणार असून शेतीला पाणीही मिळेल.

**वैद्यकीय संस्थेला मदत**— भारतीय सरकारच्या आरोग्य खात्यानें इंडिअन कॅन्सर सोसायटी ह्या संस्थेला ३०,००० रुपयांची देणगी दिली आहे. येत्या डिसेंबरमध्यें मुंबईला इंटरनॅशनल कॅन्सर रिसर्च कमिशनची बैठक भरणार आहे. तिचा खर्च भागविण्यासाठी ही देणगी देण्यांत आली आहे.

**अमरभूपाळीच्या ध्वनिमुद्रणाचा गौरव**— फ्रान्समधील कॅने येथें एक आंतरराष्ट्रीय बोलपट-प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. त्या प्रदर्शनांत 'अमरभूपाळी' बोलपटाचें ध्वनिलेखन अत्युत्कृष्ट झाल्याबद्दल बक्षिसाचें पदक देण्यांत आलें. बोलपटाचें ध्वनिलेखन फ्रेंच बोलपटांनाही मार्गदर्शक होईल असा अभिप्राय देण्यांत आला.

## जागतिक शांतता व तृणधान्यांचें–विशेषतः भाताचें महत्त्व

( वा. कृ. कोंगेकर, एल्. एजी. )

सर हॅरोल्ड टॅंपनी, ब्रिटिश कलोनिअल ऑफिसचे माजी सल्लागार, यांचे अध्यक्षतेखाली रासायनिक धंद्यांच्या मंडळांच्या शेतकी शाखेची परिषद स्कॉटलंड येथें मे, १९५२ मध्यें झाली. सदर परिषदेकरितां ब्रिटनच्या निरनिराळ्या भागांतून तसेच डेन्मार्क, स्वीडन, वगैरे देशांतून तज्ज्ञ आलेले होते व त्यांनीं आपआपल्या विषयावरील निबंधही सदर परिषदेस सादर केले होते. ता. १२ मे, १९५२ रोजीं या परिषदेमध्यें तृणधान्यांचें व विशेषतः भाताचें जगांतील उत्पन्न या विषयावर मुख्यतः चर्चा झाली. या प्रसंगीं सर हॅरोल्ड टॅंपनी आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले कीं जागतिक अन्नधान्याच्या सध्यांच्या परिस्थितींत तृणधान्यें अग्रस्थानीं आहेत. तथापि दिवसेंदिवस तीं सहज भरपूर मिळूं शकतील अशीं स्पष्ट चिन्हें दिसत नाहींत. सर हॅरोल्ड म्हणाले कीं गव्हानंतर भात हें जागतिक महत्त्वाचें तृणधान्य आहे. कारण, पूर्वेकडील देशांतील लोकांचें हें एक अत्यंत आवडीचें मुख्य अन्नधान्य आहे व पूर्वेकडील देश म्हणजे जगाची अर्धी लोकसंख्या होय; आणि ही लोकसंख्या वाढत चालली आहे. या देशांना भाताचा ( तांदळाचा ) भरपूर पुरवठा होण्यावरच जागतिक शांतता अवलंबून आहे. कारण, भरपूर तांदुळाचा पुरवठा होण्यावरच निरनिराळ्या व्यापारी मालाचें उत्पादन ( उ. रबर, चहा, नारळापासून मिळणारे निरनिराळे पदार्थ, तसेच कथील वगैरे खनिज द्रव्यें वगैरे ) अवलंबून आहे. वरील सर्व पदार्थांवरच मोठमोठे धंदे अवलंबून आहेत व यामुळेंच ब्रिटनला अत्यंत जरूर असलेले डॉलर चलन मिळूं शकतें.

**नाजुक परिस्थिति**—अर्थात्, एकंदर परिस्थिति फारच काळजी करण्यासारखी झालेली आहे. भाताच्या उत्पन्नांत वाढ न झाल्यामुळें, बाहेरदेशांहून मोठ्या प्रमाणावर गहूं व इतर धान्यें आणून परिस्थिति समतोल ठेवणें शक्य झालेलें आहे. यावरून पहातां तृणधान्यांच्या बाबतींत जागतिक परिस्थिति फारच नाजूक आहे आणि याकरितां या पिकांचें उत्पन्न वाढविण्याची अत्यंत जरूरी आहे. वरीलसारख्या परिस्थितींत सर हॅरोल्ड म्हणतात, कीं 'आंतरदेशीय गहूं करार' (इंटर नॅशनल व्हीट ॲग्रिमेंट) ही एक महत्त्वाची संस्था फारच महत्त्वाचें काम करीत आहे. तसेच 'आंतर्देशीय भात कमिशन' (इंटर नॅशनल राइस कमिशन) ही दुसरी संस्था भाताच्या बाबतींत सदोदित जागरूकपणें काम करीत आहे. जास्त उत्पन्न देणाऱ्या भाताच्या निरनिराळ्या जाती निर्माण करणें व भाताच्या पिकाकरितां रासायनिक खतांचा पुरवठा करणें हीं कामें या भात कमिशनच्या शाखा करीत आहेत. कारण, या संस्थांच्या शास्त्रशुद्ध कामामुळें तृणधान्यांपैकीं इतर कोणत्याही धान्यापेक्षां भाताच्या बाबतींत बरीच प्रगति झालेली आहे.

निरनिराळ्या देशांत पिकांचें उत्पादन वाढविण्याचे बाबतींत किती मोठा अवसर आहे हें सांगतांना सर हॅरोल्ड यांनीं खालील उदाहरणें निदर्शित केलीं. गव्हाचें एकरी उत्पन्न हॉलंड देशांत २२४० पौंड, ब्रिटनमध्यें २०५० पौंड तर कॅनडामध्यें केवळ ६०० पौंड तसेच भाताचें एकरी उत्पन्न ऑस्ट्रेलियामध्यें २५०० पौंड तर हिंदुस्थानामध्यें सुमारें ७०० पौंड व इंडोचायनामध्यें ६९० पौंड

तृणधान्यांच्या उत्पादनामध्यें वाढ होण्याची अत्यंत आवश्यकता आहे, कारण जागतिक लोकसंख्या महायुद्धापूर्वी २३० कोटी होती ती आतां २४० कोटी पर्यंत वाढत आलेली आहे. परंतु अन्नधान्याच्या उत्पन्नाचें प्रमाण मात्र कसेंबसें युद्धपूर्व स्थितींतच अद्यापि राहिलेलें आहे.

---

### इंटर नॅशनल बॅंकिंग समर स्कूल

पांचवें आंतरराष्ट्रीय बॅंकिंग समर स्कूल यंदा ऑक्सफर्ड येथें भरलें होतें. १ ऑगस्ट रोजीं तें संपलें. ३५ देशांतील बॅंकांच्या अधिकाऱ्यांनीं ह्या स्कूलचा फायदा घेतला. त्यांत श्री. हरिहर व श्री. रेगे हे दोघे बॅंक ऑफ इंडियाचे अधिकारी होते गेल्या वर्षी पॅरीस येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय बॅंकिंग समर स्कूलमध्यें महाराष्ट्र बॅंकेचे मॅनेजर श्री. जोग ह्यांना प्रवेश मिळाला होता.

ग्रेट ब्रिटनमधील इन्स्टिट्यूट ऑफ बॅंकर्सनें समर स्कूल पांच वर्षांपूर्वी सुरू केलें. दर तीन वर्षांतून एकदा तें ग्रेट ब्रिटनमध्यें भरतें व बाकीच्या प्रत्येक वर्षी तें दुसऱ्या वेगळ्या देशांत भरतें. चालू वर्षाच्या समर स्कूलमध्यें "परदेशीय बॅंकिंग व व्यापार ह्यांना पैशाचा पुरवठा" ह्या विषयावर प्रामुख्यानें चर्चा झाली. "ग्रेट ब्रिटन हा मोठा देणेकरी बनला असला, तरी ब्रिटिश बॅंकांवरील जागतिक विश्वास कायम आहे" असें समर स्कूलमधील एका व्याख्यानांत मिडलंड बॅंकेचे चीफ फॉरिन मॅनेजर, मि. थॅकस्टोन, ह्यांनीं सांगितलें.

---

### घोटी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास रिझल्ट

नाशिक जिल्ह्यांसाठी भरलेल्या सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, घोटी ता. इगतपुरी येथील परिक्षेचा निकाल लागून खालील विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. एकूण २५ विद्यार्थी परिक्षेस बसले त्यापैकीं, एक प्रथम श्रेणींत, ७ द्वितीय श्रेणींत व १० तृतीय श्रेणींत येऊन एकूण १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, ते खालील प्रमाणें:—

| | | | |
|---|---|---|---|
| १. पंढरीनाथ रावजी पठाडे, | १८६ मार्कस, | प्रथम श्रेणींत | |
| २. नारायण गवाजी एलमामे, | १७८ „ | द्वितीय श्रेणींत | |
| ३. गोपाळ रावजी भैया, | १६१ „ | „ | „ |
| ४. निंबा सिताराम वाणी, | १६० „ | „ | „ |
| ५. गजानन शंकर डांगरिकर, | १६० „ | „ | „ |
| ६ रत्नाकर लक्ष्मण पुराणिक, | १५९ „ | „ | „ |
| ७. श्रीकृष्ण नारायण पेठकर, | १५४ „ | „ | „ |
| ८. मधुकर बापूराव पाठक, | १५१ „ | „ | „ |

पास क्लास

| | |
|---|---|
| ९. शिवाजी प्रल्हाद दाणी | १४. रामचंद्र नारायण कुलकर्णी |
| १०. शेखहुसेन शेख महमद | १५. विश्वनाथ पुंजाजी आहेर |
| ११. पोपट मुरलीधर सुतार | १६. मोहन गोमाजी अहोळे |
| १२. जे. वाय. चांदवडकर | १७. बाबू किसन राऊळ |
| १३. एस. एस. मिया | १८. नाना सावळीराम मोरे |

येणेंप्रमाणें वरील परिक्षेस बसलेले उमेदवार यशस्वी झाले व बाकीचे इतर विद्यार्थी अयशस्वी ( नापास ) झाले आहेत.

सही— एन्. वाय्. कुलकर्णी,
को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर, नाशिक

---

**विमानांतून अन्नाचा पुरवठा**—बंगालमधील पुरांत सांपडलेल्या विभागांना विमानांतून अन्नाचा पुरवठा करण्यांत आला. अलिपूर-डुआर ह्या भागांतील लोकांना हिंदी विमानदलानें आतांपर्यंत ५ लाख पौंड तांदूळ, मीठ आणि इतर खाद्यपदार्थ विमानांतून खालीं टाकून पुरविले.

॥ अर्थ ॥

बुधवार, ता. १३ ऑगस्ट, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

## करन्सी–फिनॅन्स विषयक आढावा

रिझर्व्ह बँकेचा करन्सी व फिनॅन्स वरील १९५१–५२ विषयक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या पहिल्या भागांत सुमारें २५ पृष्ठांमध्यें आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील आर्थिक घडामोडींचा आढावा घेण्यांत आला असून दुसऱ्या भागांतील सुमारें २३४ पृष्ठांत हिंदी परिस्थितीची तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. १९५१–५२ मधील भारतांतील महत्त्वाची घटना म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या धोरणांत केलेला बदल ही होय. कोरियन युद्धानंतरच्या काळांत बँकांनीं दिलेल्या कर्जांत प्रमाणाबाहेर वाढ झाली व त्याचा बँकिंगवर ताण पडूं लागला. रिझर्व्ह बँकेनें बँकरेट ३% चा ३½% केला, 'ओपन मार्केट' धोरण बदलून बँकांकडून तंगीच्या मोसमांत कर्जरोखे विकत घेण्याऐवजीं त्यांचे तारणावर कर्जें देण्याचें धोरण अंगिकारलें आणि बिलमार्केटच्या योजनेस एकदाची चालना दिली. त्यामुळें, बिलांच्या तारणावर शेड्यूल्ड बँका रिझर्व्ह बँकेकडून तात्कालिक कर्जें घेऊं शकल्या. ३० जून, १९५२ अखेर रिझर्व्ह बँकेनें अशीं एकूण ७४ कोटी रुपयांचीं कर्जें वेळोवेळीं दिलीं होतीं. (१ ऑगस्ट १९५२ रोजीं अशा कर्जांची येणें रक्कम १,५३,९१,००० रु. होती शेड्यूल्ड बँकांनीं १ ऑगस्ट अखेर वेळोवेळीं घेतलेल्या अशा एकूण कर्जांची रक्कम ८१,१९,४१,००० रु झाली होती.) फेब्रुवारी–मार्चमध्यें घाऊक बाजारभाव उतरले, त्याचाहि कर्जवाढ थांबविण्यास उपयोग झाला.

१९५१–५२ ची दुसरी सहामाही आर्थिक दृष्ट्या अधिक समाधानकारक गेली. वर निर्दिष्ट केलेल्या उपाययोजनेस निर्गतीवरील कर आणि मध्यवर्ती सरकारचा उत्पन्नांतूनच खर्च भागविण्याचा कटाक्ष, ह्यांची मदत झाली. अमेरिकेचा कर्जाऊ गहूं येथें विकून त्याची रक्कम येथें सरकारास मिळाली, तिचेमुळें भांडवली खर्चाची सोय होऊं शकली. शेतीचें व औद्योगिक, दोन्हीं उत्पादन वाढलें आणि चलनाचा उपलब्ध मालाच्या मानानें झालेला भरमसाटपणा कमी झाला. १९४६ मधील औद्योगिक उत्पादन १०० मानलें तर तें १९५० मध्यें १०५·२ होतें आणि १९५१ मध्यें ११७·४ झालें. मालक–कामगार संबंधांत सुधारणा, कच्च्या मालाचा अधिक पुरवठा, इत्यादि कारणांमुळें औद्योगिक क्षमतेचा अधिक उपयोग केला गेला. अन्नपरिस्थिति मात्र बिकट होती आणि १९५० चे मानानें दुपटीपेक्षां ज्यास्त धान्य (४७·२ कोटी टन) बाहेरून आणून ती परिस्थिति आटोक्यांत ठेवण्यांत आली.

किंमतीची पातळी साधारणपणें खालीं खालीं स्थिर होत गेली. १९५०–५१ मध्यें किंमती १५·०% वाढल्या होत्या; १९५१–५२ मध्यें त्या १५·९% उतरल्या. कित्येक देशांत कोरियन युद्धामुळें जेवढ्या किंमती चढल्या तेवढ्या त्या भारतांत चढल्या नाहींत; परंतु किंमती उतरल्या त्यावेळीं मात्र भारतांतील उतार इतर देशांचे मानानें मोठा झाला. पैशाचा पुरवठा १९५१–५२ मध्यें १७२ कोटी रुपयांनीं कमी झाला; १९५०–५१ मध्यें तो ९९ कोटी रुपयांनीं वाढला होता. १९५१–५२ च्या तेजीच्या मोसमांत पैशाच्या पुरवठ्यांत फक्त ९ कोटींची भर पडली; १९५०–५१ मध्यें ती २१६ कोटी रुपयांची होती. भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावतीचा तो मुख्यतः परिणाम आहे. १९५०–५१ मध्यें २५ कोटी रुपयांची अनुकूल तफावत होती; ती १९५१–५२ मध्यें १६१ कोटी रुपये प्रतिकूल झाली. सरकारच्या रिझर्व्ह बँकेकडील शिलकांतील वाढ आणि शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत घट (१९५०–५१ च्या मानानें निम्मी कर्जें: ८५ कोटी रु. ऐवजीं ४६ कोटी रु.) ह्यांचा परिणाम पैशाचा पुरवठा कमी होण्याच्या प्रवृत्तीस पोषकच झाला. अमेरिकेंतील गहूं-खरेदीसाठीं अमेरिकेनें दिलेलें कर्जहि ह्या कामीं आलें.

---

### पैशाचा पुरवठा : मोसमवार फरक

(आकडे कोटी रुपयांचे)

| | मंदीचा मोसम मे १२, १९५० ते सप्टेंबर २९, १९५० | तेजीचा मोसम सप्टेंबर २९, १९५० ते मे ११, १९५१ | मंदीचा मोसम मे ११, १९५१ ते ऑक्टो. २६, १९५१ | तेजीचा मोसम ऑक्टो. २६, १९५१ ते एप्रिल ११, १९५२ |
|---|---|---|---|---|
| प्रसृत नोटा | –९९·७६ | +२०६·८८ | –१७२·४० | +४१·२७ |
| रिझर्व्ह बँकेच्या परदेशांतील शिलका | –४३ ३९ | +७३·९६ | –८४·९२ | –८१·१८ |
| रिझर्व्ह बँकेजवळील हिंदी रोखे | +१·५१ | +८२·५६ | –२७·४८ | –३५·३७ |
| रिझर्व्ह बँकेजवळील मध्यवर्ती सरकारच्या ठेवी | +३०·४६ | –३० ९९ | +५८·६३ | –४६·५५ |
| दिलेलीं कर्जें | –६·०५ | +१८·४२ | –१६·२४ | +४४·७६ |
| शेड्यूल्ड बँकांचीं देणीं | +१९·८२ | +२१·१० | –१५·७९ | –२८·९१ |
| शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं कर्जें | –६२·०० | +१७२·६४ | –८५·८६ | +९५·६८ |
| समाजाजवळील पैशाचा पुरवठा | –९५·८† | +२१६·३† | –१९२·२† | +८·७ |
| घाऊक किंमती | +५·२ | +१०·५ | - ४६ | –१३·९ |

---

### पुणें सें. को. बँक लि.

वरील बँकेस ३० जून, १९५२ अखेर संपलेल्या वर्षी ८१,३२२ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांना ६% डिव्हिडंड मिळेल. एकूण ताळेबंद १,६१,७६,६२९ रुपयांचा आहे. बँकेनें ६६ लक्ष रुपये सोसायट्यांच्या कर्जांत गुंतविलेले आहेत एकूण ठेवी १ कोटि, १८ लक्ष रुपयांच्या आहेत.

## सरकारला भांडवल लोकांनीं का द्यावें ?

गेल्या आठवड्यांत चार राज्यसरकारांनीं कर्जें उभारलीं, त्यावेळीं मद्रास राज्याचे पंतप्रधान, श्री. राजगोपालाचारी, ह्यांनीं रेडिओवरील आपल्या भाषणांतून सरकारी रोख्यांचें स्वरूप व त्यांचें महत्त्व अत्यंत सोप्या शब्दांत पटवून दिलें. बड्या लोकांनीं कर्ज-उभारणीस मदत केली नाहीं, तर तें त्यांना घातुक होईल असें त्यांनीं मोठ्या खुबीनें सुचविलें. कांहीं देशांत, खासगी व्यापार व उद्योग, आणि बँका व विमा कंपन्या ह्यांस अजिबातच वाव नाहीं ह्या परिस्थितीचा त्यांनीं उल्लेख केला व भारतांतील पैसेवाल्यांनीं त्यांचे उद्योगधंदे किफायतशीर व निर्वेध चालू रहावे ह्यासाठी सरकारचे हात बळकट करावे, असा गर्भितार्थ त्यांच्या भाषणांतून निघाला सामान्य लोकांच्या स्वाभिमानास त्यांनीं जागें करून, लोकशाहीमध्यें प्रभावी भागीदारी करण्याचें त्यांना आवाहन केलें. श्री. राजगोपालाचारी ह्यांच्या भाषणांतील मुद्दे दीर्घकालीन महत्त्वाचे असल्यामुळें, त्यांच्या भाषणाकडे लक्ष वेधणें अगत्याचें वाटतें.

### पैसेवाल्यांनीं काळाचा ओघ जाणावा

"व्यापाऱ्यांना जरूर त्यावेळीं कर्जें देऊन बँका त्यांची मोठी सेवा करतात. त्यामुळें व्यापार व उद्योगधंदे चालू रहातात. लहान मुदतीचीं कर्जें देण्याकडेच बँकांची मुख्यः प्रवृत्ति असते. बिगर-व्यापारी वर्गाकडून बँका ठेवी स्वीकारतात आणि त्यांचें मुद्दल व व्याज ठरल्याप्रमाणें त्यांना परत देतात. स्टॉक एक्सचेंजवरील चढउतारांचा त्यावर कांहींहि परिणाम होत नाहीं. तथापि, चांगलें सरकार सत्ताधीश नसेल तर हें चालू रहाणार नाहीं, हें स्पष्टच आहे. पण सरकार म्हणजे तरी राष्ट्रीय अडचणींचें प्रतिबिंब एकत्रित करणारी संघटना असते, एवढेंच. राज्यसरकारांत एकमेकांत व राज्यसरकारें व मध्यवर्ती सरकार ह्यांच्यांत पैशाबाबत एक प्रकारची स्पर्धा ( मग ती कितीहि शांत अथवा अनुल्लिखित असो ) चालू असते ही स्पर्धा स्वाभाविक असली तरी त्यानें गोंधळास मदत होते आणि त्यांतून लोकांत निष्क्रियता निर्माण होते. बँका आणि विमा कंपन्या ह्यांनीं त्यांचेजवळील लोकांच्या बचतीच्या संचयाचा, सरकारच्या नडी भागविण्यासाठी उपयोग होऊं दिला पाहिजे. उद्योगपती व व्यापारपती काळाचा ओघ ओळखत आहेत, अशी माझी खात्री आहे. तेव्हां त्यांनीं ह्या विनंतीचा भलता अर्थ करूं नये व त्यांनीं सरकारांची पत राखण्यास मदत करावी. राज्यसरकारांना फार कठीण परिस्थितींत कामें करावयाचीं आहेत. राष्ट्रसंवर्धक कामाची प्राथमिक जबाबदारी राज्यसरकारांवर आहे, आणि ती पार पाडण्यासाठी भांडवली खर्च त्यांना करणें भाग आहे.

### सरकारच्या कारभारांत भागीदार

"केवळ शाब्दिक चर्चेंतच नव्हे, तर प्रत्यक्ष पैसे गुंतविण्यांतहि लहान माणसांनाहि मोठा वाव आहे. राज्यकारभाराचें काम श्रीमंतापुरतेंच मर्यादित नाहीं. आपल्या देशांतील बहुसंख्य कुटुंबांनीं १०० रुपये एकत्र पाहिलेले सुद्धां नाहींत. त्यांच्या हितासाठी सरकार बांध, धरणें, इत्यादि दूरगामी उपयुक्ततेच्या गोष्टी करीत आहे. तार्बिक उत्पन्नांतून त्यांच्या खर्चाची तरतूद होऊं शकत नाहीं, म्हणून भांडवल उभारावें लागतें. ज्यांना थोडेसे पैसे अशा चांगल्या कामासाठी देतां येतील, त्यांनीं कर्जरोखे अगत्य घ्यावेत. बँका आणि विमा कंपन्या ह्यांचा धंदा देशांतील प्रजाजन सुखी आणि समृद्ध केल्याविना वाढणार नाहीं हें त्यांना माहीत असून सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीची श्रेष्ठता त्यांना पटलेली असते. सरकार म्हणजे एक मोठी थोरली सहकारी संस्था होय. सहकारी सोसायटीच्या प्रत्येक सभासदानें थोडी ठेव तिचेकडे ठेवल्याखेरीज तिचें भांडवल वाढणार नाहीं व ती उपयुक्त कार्य करूं शकणार नाहीं. जनतेच्या सुखसोईसाठी सरकारलाहि लोकांनीं कर्जें दिलीं पाहिजेत. श्रीमंत लोक थोडे आहेत, पण लहान लहान रकमा गुंतवूं शकणारे लोक देशभर पसरलेले आहेत. सरकार ठराविक मुदतीनंतर कर्जाची रक्कम परत देते व वक्तशीर व्याज देतें. रोख रक्कम मधें लागली, तर करन्सी नोटेप्रमाणें सरकारी रोखे सुलभतेनें वटवितां येतात. लोकशाही ह्याचा अर्थ, प्रत्येकानें सरकारच्या कारभारांतील आपला वाटा उचलला पाहिजे. सरकारच्या व्यवहारांत १०० रुपये गुंतविल्यानें त्यांत प्रत्यक्ष भाग घेतल्याचें श्रेय मिळतें. १०० रुपयांचा रोखा घेणारा मेटुरचें धरण, भवानी ॲनिकट, पायकारा वर्क्स, कृष्णा व गोदावरी कालवे, इत्यादींत १०० रुपयांचा भागीदार बनतो. हीं सर्व कामें सामान्य जनांसाठींच आहेत व त्यांच्यासाठी १०० रुपयांचें कर्ज देणारा त्यांत खराखुरा भागीदार होतो."

## हिंद-ब्रिटन व्यापार

### आयातीचे प्रमुख आकडे

१९५२ च्या पहिल्या सहामाहींत, ग्रेट ब्रिटननें जेवढी तंबाखू आयात केली, तिच्या ७१% भारताची होती. चहाच्या एकूण आयातींत ६०% चहा हिंदी होता, तागाच्या कापडाच्या आयातांपैकीं ८०% हिंदी होतें ह्याच मुदतींत ग्रेट ब्रिटननें २१,८८,१७,००० पौंड किंमतीची ५,५१,७१२ टन यंत्रसामुग्री निर्गत केली. त्यांपैकीं १,९०,००,००० पौंड किंमतीची ५२,३८२ टन यंत्रसामुग्री भारतानें घेतली. ह्या आयातीची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे:—

| | | |
|---|---|---|
| कापड गिरण्यांची यंत्रसामुग्री | | ८,६९९ टन |
| | किं. | ३९,८२,००० पौंड |
| इंटर्नल कंबश्चन इंजिनें | | १,९२,५८५ बी. एच्. पी. |
| | किं. | २६,४०,००० पौंड |
| मशीन टूल्स | | १,८३९ टन |
| | किं. | ६,५८,००० पौंड |
| जनरेटर्स | | १,४२० टन |
| | किं. | ७,४९,००० पौंड |
| मॅकॅनिकल हँडलिंग मशिनरी | | १,७८५ टन |
| | किं. | ४,५०,००० पौंड |
| मोटार वहानें | किं. | ९१,५२,००० पौंड |
| रसायनें, रंग | किं. | ६५,४४,००० पौंड |
| वीज साहित्य | किं. | ५१,६५,००० पौंड |

### पतीच्या स्वातंत्र्यावर गदा

इटालिअन सरकारनें केलेल्या नव्या कायद्यानें, पत्नीला परदेशीं जावयाचें असल्यास तिला त्यासाठी पतीची लेखी संमति पूर्वी लागत असे ती रद्द केली आहे. परंतु, पतीला पासपोर्ट हवा असेल तर त्यानें मात्र पत्नीची संमति अर्जास जोडली पाहिजे, असें बंधन कायद्यानें घातलें आहे.

### महारोग्यांची व्यवस्था

भारतांत सुमारें १२ लक्ष महारोगी आहेत त्यांपैकीं फक्त ४,५९० रोग्यांसाठी ४७ संस्थांतून सोय आहे. दक्षिण व नैर्ऋत्य भारतांत महारोगाचा फैलाव अधिक आहे.

## अतिपूर्वेकडील ब्रिटिश एक्सचेंज बँका

१९ व्या शतकांतील अनिर्बंध आर्थिक स्वातंत्र्याच्या आणि खुल्या अर्थव्यवस्थेच्या कल्पना आतां मागें पडल्या असून आर्थिक नियोजनाच्या– विशेषतः सरकार् पुरस्कृत नियोजनाच्या कल्पना अधिकाधिक प्रमाणांत महत्त्व पावू लागल्या आहेत. ह्या प्रवृत्तीस अनुसरून चलन, किंमती, उत्पादन व व्यापार ह्यांच्यावरही सरकारी बंधनें येणें अपरिहार्यच आहे. युरोप व पूर्वेकडील देश आणि आशिआंतर्गत देश ह्यांच्यांतील व्यापार विस्तृत प्रमाणावर चालावा म्हणून अतिपूर्वेकडील देशांत ब्रिटिश एक्सचेंज बँका स्थापन करण्यांत आल्या. ह्या बँकांमुळेंच आशियांतील राष्ट्रांच्या चलनास स्थैर्य आलें होतें, आणि त्या राष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या स्थापनेस मदत झाली होती. पण अलीकडे सर्वच अतिपूर्वेकडील राष्ट्रांतून राष्ट्रीय आकांक्षांची लाट आलेली आहे. १९४२ पासून जीं पूर्वेकडील राष्ट्रें जपानच्या ताब्यांत गेलीं होतीं त्या राष्ट्रांत एक प्रकारचें चलनविषयक अराजकच माजलें होतें. त्याचें कारण म्हणजे जपाननें छापलेल्या भरमसाठ चलनी नोटा. ह्या देशांतील आर्थिक स्थैर्य आणि राजकीय अव्यवस्था ह्यांच्यामुळें व्यापाराला अडथळा उत्पन्न व्हावा हें साहजिकच होतें. असें असूनसुद्धां ब्रिटिश एक्सचेंज बँकांनीं ह्या देशांच्या परदेशीय व्यापाराला दिलेल्या बँकिंगच्या सवलतींमुळें त्यांचा व्यापार आतां पुन्हा लक्षांत भरण्याइतका वाढला आहे.

युद्धापूर्वी आशिआंतील सर्व राष्ट्रांचीं चलनें पौंडाच्या हुंडणावळीच्या दरावर आधारलेलीं होतीं. चीन आणि सयाम ह्यांची चलनपद्धति सुद्धां पौंडावरच आधारलेली होती. इंडोचायनाचें चलन फ्रँकशीं निगडित होतें; इंडोनेशिआचें चलन डच गिल्डरशीं निगडित होतें आणि फिलिपाइन्सचें अमेरिकेच्या डॉलर्सशीं निगडित होतें. हे सर्व देश आपापल्या देशांतील चलनाला तारण म्हणून परकीय हुंडणावळींचें कांहीं प्रमाण राखीव म्हणून ठेवीत असत ब्रिटिश वसाहतींत हें तारण १०० टक्के असें; फक्त भारत मात्र ४० टक्के ठेवीत असे ह्या सर्व राष्ट्रांच्या अंतर्गत व्यवहारांत ज्या चलनी नोटा प्रचारांत असत त्यांचें प्रमाण परदेशीय व्यापारांतील देण्याघेण्याच्या तोलावर अवलंबून असे. अंतर्गत चलनांची परदेशीं हुंडणावळींतील किंमत ह्या तोलाप्रमाणें कमीजास्त होत असे. युद्धानंतर ही परिस्थिति पालटली. युद्धापूर्वी फक्त चीन आणि भारत ह्या दोनच देशांत मध्यवर्ती बँका होत्या. पण १९४५ सालानंतर नोटा काढण्याची सत्ता असलेल्या आणि पतीच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणाऱ्या अशा मध्यवर्ती बँका पाकिस्तान, सीलोन, ब्रह्मदेश, सयाम व फिलिपाइन्स ह्या देशांतून स्थापन करण्यांत आल्या. हाँगकाँग मध्यें ब्रिटिश हुंडणावळीच्या बँकाच चलन काढतात हाँगकाँग, ब्रह्मदेश व मलाया ह्यांचे हुंडणावळीचे व्यवहार अनियंत्रित म्हणजेच मामुली पद्धतीनें चालतात. अशी पद्धत ज्या ठिकाणीं चालू असते त्या ठिकाणीं चलनाची अंतर्गत किंमत आणि परदेशीय किंमत ह्यांच्यांत कांहींतरी संबंध राहूं शकतो. नाहींतर इंडोचायनासारखी परिस्थिति निर्माण होऊन मध्यवर्ती बँकेवर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. १९५० सालीं इंडोचायनांत ज्या मालाच्या आयातीला परवानगी होती त्याची आयातीची किंमत देण्यासाठी १ पौंडाला ५८ पिआसट्रेज असा दर अधिकृत रीत्या ठरलेला होता. पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र हाँगकाँगला एका पौंडाला १०६ पिआसट्रेज मिळत असत. अलीकडे पूर्वेकडील देशांतील बँकांतून ठेवींच्या रकमा वाढल्या आहेत. त्यावरून परिस्थिति आतां अधिक स्थिरावल्यासारखी दिसते. भारताचा आणि अतिपूर्वेकडील देशांचा औद्योगिक विकास होण्यासाठी परकीय भांडवलाच्या गुतंवणुकीची फार गरज आहे. पण ही गरज भागणें त्या देशांतील स्थिरस्थावरणेवरच अवलंबून आहे. कोलंबो योजनेप्रमाणें रस्ते, रेल्वे, बंदरें आणि औद्योगिक शक्ति मुख्यतः वीज ह्यांचा विकास करण्यांत यावयाचा आहे. अशा प्रकारच्या उद्योगांत खाजगी भांडवल घालण्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत त्यांतूनहि जें थोडेंबहुत खाजगी भांडवल पुढें येईल त्याला राष्ट्रीय आकांक्षांची आणि राष्ट्रीयकरणाची भीति वाटत आहे. फिलिपाइन्स देशाचा आर्थिक आढावा अमेरिकेच्या एका आर्थिक मंडळानें तयार केला आहे. आपल्या अहवालांत मंडळानें परकीय कंपन्यांवर घालण्यांत आलेल्या आयातविषयक निर्बंधांचा उल्लेख केला आहे. गुंतविण्यांत आलेलें भांडवल आणि त्यावर होणारा नफा देशांबाहेर नेण्यास परवानगी देण्यांत येईल कीं नाहीं अशी शंकाही अहवालांत व्यक्त करण्यांत आली आहे. अतिपूर्वेत ज्या ब्रिटिश हुंडणावळीच्या बँका आहेत त्यांच्या कांहीं अध्यक्षांनीं त्या त्या देशांतील भारी करांबद्दलही नापसंति व्यक्त केली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें अशा भारी करांमुळें व्यापारी व औद्योगिक घडामोडी मंदावतात आणि सरकारच्या भरमसाठ खर्चामुळें चलनवृद्धीही होते.

ब्रिटिश बँका जेव्हां पहिल्यानें स्थापन करण्यांत आल्या, त्यावेळीं बंदरापासून बंदरापर्यंतचा व्यापार सुरळीत करावा एव्हढाच त्यांचा उद्देश होता परंतु नंतर त्यांनीं आपली व्यवहाराची कक्षा पुष्कळच वाढविली. आतां त्या ठेवी स्वीकारतात आणि सामान्यपणें जे व्यवहार व्यापारी बँका व डिस्कौंट बँका करतात तेही त्या आतां करूं लागल्या आहेत. ब्रिटिश कॉमनवेल्थमधील ज्या राष्ट्रांत तद्देशीय बँका फारशा विकसित झालेल्या नाहींत तेथें अर्थातच ब्रिटिश हुंडणावळीच्या बँका प्रधानपद पावलेल्या आहेत. उदाहरणार्थ, १९४९ सालीं भारतांतील सर्व बँकांनीं जितकीं कर्जें दिलीं होतीं त्याच्या फक्त २५ टक्केच कर्जें भारतामधील ब्रिटिश हुंडणावळीच्या बँकांना दिलीं होतीं. ठेवींसंबंधीं हें प्रमाण १८ टक्केच होतें. सयाममध्यें १९३८ सालीं बँकांजवळ जेवढ्या ठेवी होत्या त्यापैकीं ५८ टक्के ठेवी परदेशीं बँकांजवळ होत्या. १९४९ सालीं हें प्रमाण ३३ टक्क्यावर आलें. तथापि, ब्रिटिश हुंडणावळीच्या बँकांच्या मागें जी परंपरा आहे तीमुळें पूर्वेकडील राष्ट्रांचा परदेशी व्यापार वाढविण्यांत त्यांची मदत इतरांच्या मदतीपेक्षां अधिक प्रभावी ठरेल ह्यांत शंका नाहीं.

### इराण व तेल-कंपनी ह्यांचेमधील तंटा

अँग्लो-पर्शियन तेलाच्या तंट्याचा निवाडा करण्याचा इंटर नॅशनल कोर्ट ऑफ जस्टिसला अधिकारच नाहीं, असें त्या कोर्टानेंच ठरविलें आहे. इराणांतील कोर्टांत अँग्लो पर्शिअन तेल कंपनी दावा आणूं शकेल, परंतु त्यांत कंपनी यशस्वी होणें अशक्य आहे. कायदा घटनेच्या विरुद्ध आहे, एवढ्याच मुद्यावर कोर्ट त्यास बेकायदेशीर ठरवूं शकेल, परंतु ह्या बाबतींत तसा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. इराणी कायद्याचा भंग करण्यांत आलेला आहे अशी कंपनीची मुळी तक्रारच नाहीं. आंतरराष्ट्रीय कायद्यास मोडून राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें आहे, असें कंपनीचें म्हणणें आहे. १९३३ च्या करारांतील २२ (ढ) कलमाप्रमाणें इंटर नॅशनल कोर्टाच्या अध्यक्षानें लवाद नेमावा, अशी मागणी करण्याचा कंपनीचा विचार आहे. लवाद नेमला तरी इराणी सरकार त्याच्या अधिकारास मान्यता देणार नाहीं, हें उघड आहे. सबंध करार रद्द झाल्यावर, २२ (ढ) हें कलम तरी कोठें रहातें ? असें इराणी सरकार म्हणणार. कांहींतरी मार्ग निघून, इराणचें तेल पूर्ववत निर्गत होऊं लागणें इराणच्या हिताचें आहे, ह्या परिस्थितीवरच तेल-कंपनीची आतां भिस्त आहे.

# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

**–संचालक मंडळ–**

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. SC., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर–चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षे ४ टक्के.

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २. गो. गं. साठे, मॅनेजर.



१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

## वे स्ट र्न इं डि या

विमा कंपनीनें
आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा
यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी
वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

# वेस्टर्न इंडिया लाईफ
## इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर–ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें–१

फोन नंबर— ३४०२



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन १९११

तारेचा पत्ता : फार्मर बँक टे. नं. २५४६१ | पोस्ट बॉक्स नं. ४७२

चेअरमनः–श्री आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | ४८,८५,२०० |
| गंगाजळी फंड | रु. | ३९,१८,७०० |
| ठेवी | रु. | ६,९२,८४,९०० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,८०,४९,८०० |

## १५ जिल्ह्यांत ६२ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि सेंट्रल म्युच्युअल लाइफ इं. कं. लि.

वरील म्युच्युअल कंपनीनें १९५१ सालीं ५,४८,७०० रुपयांचें नवें काम पुरें केलें व्यवस्था खर्चाचें रिन्युअल प्रिमिअम उत्पन्नाशीं प्रमाण फक्त १४.२% पडलें. खर्चाचें प्रमाण मर्यादेंत ठेवून चांगल्या दर्जाचे विमे मिळविण्यांत कंपनीनें उत्कृष्ट यश संपादन केलें आहे अहवालाचे वर्षीं लाइफ फंडांत ९६,१८५ रु चीं भर पडून तो ५,४०,१८५ रु. झाला आहे. कंपनीला तिच्या गुंतवणुकीवर गेल्या वर्षींपेक्षां अहवालाचे वर्षीं अधिक व्याज सुटत आहे. सरकारी रोख्यांच्या किंमती उतरल्या, त्याच्या घसाऱ्याच्या तरतुदीसाठी कंपनीनें इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड २०,५८७ रु. पर्यंत वाढविला आहे. अहवालाचे वर्षीं फक्त ६,५२५ रु. चे क्लेम दाखल झाले. कंपनीच्या पुणें येथील हौसिंग कॉलनीमधील खपलेल्या प्लॉटसूवर लवकरच बंगले बांधले जाऊन उरलेल्या थोड्या प्लॉटसला मागणी वाढेल अशी अपेक्षा आहे.

कंपनीची वार्षिक सभा २८ जुलै रोजीं श्री. फाझल ए. फाझलभाय, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. कंपनीचे चेअरमन श्री. शांतिलाल शहा ह्यांची मुंबई राज्याच्या मंत्रिमंडळांत नेमणूक झाल्यामुळें श्री. फाझलभाय ह्यांचीच आतां चेअरमन म्हणून निवड झाली आहे. श्री. शंकरराव आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर, ह्यांनीं कंपनीच्या स्थापनेपासून चोख कारभार, काटकसर, भक्कमपणा, इत्यादींस महत्त्व देऊन कंपनीची अव्याहत प्रगति घडवून आणली आहे.

### श्री. फाझलभाय ह्यांचें भाषण

"कंपनीची जवळ जवळ पन्नास टक्के रक्कम, कायद्यानेंच सरकारी रोख्यांत गुंतवावी लागते, पण त्यांची किंमत स्थिर राहील याची काळजी सरकार घेत नाहीं. पण घसाऱ्याची तरतूद करून ठेवण्याची मात्र सक्ति केली जाते. हा अन्याय असून त्याकरितां रोख्यांची दर्शनी किंमत व खरेदीची किंमत, यांतील जी कमी असेल ती, मूल्यमापनासाठी धरण्याची मुभा असावी. खास विमाकंपन्यांकरितां चार टक्के करमाफ दराचें एकादें कर्ज सरकारनें उभारल्यास विमा कंपन्या त्याचा खात्रीनें फायदा घेऊं शकतील. लीजच्या जागेवर कर्ज देण्यासंबंधीचे कायद्यांतील निर्बंध शहरांतील नव्या घरांचा प्रश्न सोडविण्याचे बाबतींत आड येतील. स्पेशल एजंटांवरील कमिशनचे निर्बंध लहान कंपन्यांना फार जाचक होणारे असले तरी या कंपनीचें बरेंचसें काम कंपनीनें परस्पर नेमलेल्या एजंटांकडून मिळत असल्यामुळें कंपनीची सध्यांतरी या बाबतींत कुचंबणा होत नाहीं. अर्थात् कायद्याचे परिणाम, लहान व मोठ्या कंपन्यांना निरनिराळ्या तऱ्हेनें भोगावे लागावे ही गोष्ट खासच बरी नाहीं. प्राप्तीकर आकारणीसंबंधीं दुरुस्त बिलांत सुद्धां म्युच्युअल कंपन्यांवर होणारा अन्याय दूर झालेला नाहीं. को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स कंपन्यांप्रमाणेंच म्युच्युअल कंपन्या विमेदारांच्याच सर्वस्वीं मालकीच्या असल्यामुळें बोनस म्हणून वाटावयाच्या रकमेवर प्राप्तीकर आकारला जाऊं नये."

---

**ताजमहालची दुरुस्ती**— आग्रा येथील ताजमहालांत कांहीं ठिकाणीं पावसाचें पाणी गळत असल्याचें आढळून आलें आहे. भारतीय सरकारनें ताजमहालाची दुरुस्ती करण्यासाठी ३,९२,७१९ रुपये ह्यापूर्वींच खर्च केले आहेत. पण तेवढ्यानें न भागतां आणखी खर्च करावा लागत आहे. दुरुस्तीचें काम चालू असून तें १९५४ अखेर पुरें होईल. ताजमहाल बांधून ३२० वर्षें झालीं.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

### पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

---

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

## दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधी पाहिजेत.

**शं. न. आगाशे**
मॅनेजिंग डायरेक्टर

---

## दि सांगली बँक लिमिटेड

### सांगली

( स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक )

### मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटी |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

सांगली येथें सेफ् डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एस्. ई. सुखटणकर, D F. C., I. A S. (चेअरमन)
कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा व.वाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

### श्री. आण्णाप्पा नारायण कल्याणी ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण

सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेचे चेअरमन, श्री. आण्णाप्पा नारायण कल्याणी ह्यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ ३ ऑगस्ट, १९५२ रोजीं नागरी पुरवठामंत्री ना. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हस्तें झाला त्यानिमित्तानें श्री. कल्याणी ह्यांच्या जीवनचरित्राचें दर्शन करून देणारें त्यांचें एक अल्प चरित्र प्रसिद्ध करण्यांत आलें, तें तरूण पिढीस उद्बोधक व स्फूर्तिदायक झाल्याविना रहाणार नाहीं. त्यांचा जन्म एका सुखवस्तु कुटुंबांत झाला होता, पण पुढें काळ उलटला. व्यापारांतील नुकसानीमुळें होतें-नव्हतें तें सर्व गेलें, संकटांवर संकटें आलीं आई, पिता, भाऊ, ह्या सर्वांस ते मुकले. दुसऱ्याच्या दुकानांत उमेदवारी करण्यास त्यांनीं प्रारंभ केला, पण त्यांच्या कर्तबगारीस कोंडमारा नको होता, आणि त्यांनीं व्यापारास १९०६ सालीं स्वतंत्र सुरवात केली. आज सांगली, कराड, मुंबई, चिपळूण, इत्यादि ठिकाणीं हळद, शेंग, आणि गुळाचे बाजारांत त्यांना ओळखत नाहीं, असा व्यापारी विरळा. व्यापाराप्रमाणें शेतींतहि त्यांनीं चांगलेंच नांव कमावलें आहे. सामाजिक, आर्थिक व औद्योगिक क्षेत्रांतहि त्यांनीं नांव मिळविलें. सातारा जिल्हा लँड मॉर्गेजक बँकेचें ऑफिस कराडांत असण्याचें कारण रावसाहेब कल्याणी ह्यांनीं त्याबाबत दाखविलेला उत्साह आणि घेतलेली जबाबदारी हेंच होय. बँकेच्या स्थापनेपासून आजवर म्हणजे १७ वर्षें तेच तिचे चेअरमन असून त्यांच्या मार्गदर्शनाखालीं तिनें उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. सातारा जिल्ह्यांतील संस्थानी भागांच्या विलिनीकरणानंतर, कराड, वाळवा व तासगांव तालुके जाऊन एकट्या कराड तालुक्यावर बँक चालणार नाहीं हें श्री. कल्याणी व त्यांचे सहकारी ह्यांनीं योग्य वेळीं सात्यास पटवून दिलें व बँकेचे कार्यक्षेत्रांत जत, मिरज तालुक्यासह द. सातारा जिल्हा असावा असा निर्णय घेण्यांत आला. द सातारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या सोईसाठी सांगली येथें १५ मार्च, १९५० रोजीं ऑफिस उघडण्यांत आलें १९३६ पासून बँकेंत काम करीत असलेले श्री. एम्. एस्. पुटाणी ह्यांची १९१८ सालीं स्वतंत्र मॅनेजर म्हणून नेमणूक करण्यांत आली. मुंबई राज्यांतील लँड मॉर्गेज बँकांत, सातारा जिल्हा बँकेइतकी सेवा करूं शकणारी एकादीच बँक असेल.

प्रस्तुत प्रसंगाचे निमित्तानें आम्हीं श्री. कल्याणी ह्यांना दीर्घायुष्य चिंतितों.

---

### दि कमर्शिअल बँक ऑफ कोल्हापूर

वरील बँकेनें आपले व्यवहार बंद केले असल्याचें समजतें. बँकेची स्थापना १९१६ सालीं झाली होती व तिच्या शहरांत तीन शाखा होत्या. तिचें खेळतें भांडवल सुमारें ३५ लक्ष रुपये होतें.

---

### राज्यसरकारांचीं कर्जें

मुंबई, मद्रास, प. बंगाल आणि उत्तर प्रदेश ह्या चार राज्यसरकारांनीं उभारलेलीं कर्जें यशस्वी झालीं. परंतु त्या सर्वांत मद्रास राज्यानें आघाडी मारली. त्याला ५ कोटी रु. हवे होते, ते ६ कोटी, ६ लक्ष मिळाले. तें सरकार ५½ कोटी रुपये ठेवून घेईल. इतर राज्यसरकारांनीं मिळालेलें सर्व कर्ज ठेवून घेतलें आहे.

---

### खतांची आयात : मद्रासची मोठी मागणी

भारताला १९५२ मध्यें ४,१८,००० टन कृत्रिम खतें लागतील त्यांपैकीं ३,६८,००० टनांची मागणी राज्यसरकारांनीच केली आहे. परंतु, सिंद्री कारखाना १९५२ मध्यें २,००,००० टनांपेक्षां ज्यास्त उत्पादन करूं शकणार नाहीं. त्याची पुरी उत्पादनक्षमता (दरसाल ३,५०,००० टन) साध्य होण्यास आणखी कांहीं वर्षें लागतील. शिलकी साठा व इतर ठिकाणचें उत्पादन लक्षांत घेतां, १९५२ मध्यें १,७० ००० टन खतांची आयात करावी लागेल असें समजतें. सर्व राज्यांत मद्रास सरकारची खतांची मागणी मोठी—१,६३,००० टनांची—आहे. त्याचे खालोखाल संयुक्तप्रांत (४१,००० टन), मुंबई (३०,००० टन), प. बंगाल (१३,००० टन), हैदराबाद (१२,२०० टन), पू. पंजाब (३,५०० टन), ओरिसा (५,००० टन), मध्यप्रदेश (६००० टन), म्हैसूर (३,४४० टन), व बिहार (२,००० टन) असा अनुक्रम लागतो. चहाच्या मळ्यांना ५५,००० टन, कॉफीला ६,००० टन, द. भारतांतील मळेवाल्यांना १३,००० टन, अशीं खतें हवीं आहेत.

---

### आजचा सिलोन

आज सिलोन हा आशियांतील सर्वांत समृद्ध देश आहे. कदाचित्, फक्त जपानचा अनुक्रम त्याच्यावरती लागेल. चहा आणि रबर ह्यांच्या निर्गतीमुळेंच हें शक्य झालें आहे. सिलोनच्या निर्गतीपैकीं ७१% निर्गत चहाची व रबराची असते. चहाच्या मळ्यापैकीं ७५% व रबराच्या मळ्यापैकीं ३५% मळे अजून युरोपियन मालकीचे आहेत, परंतु हळूहळू सिलोनी मालकी वाढत आहे. तांदूळ हें सिलोनी लोकांचें प्रमुख अन्न आहे, परंतु तें अजून महाग आहे. सिलोनमधील दोनतृतीयांश जमीन अद्याप पडीक आहे. जमीन सुपीक असून पाऊसहि भरपूर आहे. सिलोनच्या लोकसंख्येंत दरसाल सुमारें २,००,००० ची भर पडत आहे. औद्योगीकरणास आवश्यक तो कोळसा तेथें सांपडत नाहीं आणि पडत्या पाण्यापासून वीज करतां येण्याजोगी आहे तरी त्यास पैसा व वेळ लागेल.

---

### बर्नार्ड शॉ स्मारकास फंड मिळत नाहीं

ब्रिटिश अर्थमंत्री, मि. बटलर, ह्यांनीं सुरू केलेला बर्नार्ड शॉ मेमोरिअल फंड पुरेशा वर्गण्यांच्या अभावीं बंद करावा लागणार आहे. २,५०,००० पौंड जमविण्याचा संकल्प केलेला होता.

---

**विश्वभारतीला देणगी—** बाटा बुटांच्या कंपनीनें विश्वभारतीला १९५३ सालापासून ५ वर्षेंपर्यंत दरवर्षीं १०,००० रुपयांची देणगी देण्याचें ठरविलें आहे. ह्या देणगींतून कंपनीचे संस्थापक थॉमस बाटा ह्यांच्या नांवानें विश्वभारतींत एक अर्थशास्त्रविषयक प्राध्यापकपद निर्माण करण्यांत येईल. बंगाल चेंबर ऑफ कॉमर्सनेंही संस्थेला अशीच देणगी दिली आहे.

**गोरिलाचा वाढदिवस—** फिलाडेल्फिआ येथील प्राणिसंग्रहालयांत 'बँबू' नांवाचा एक गोरिला जातीचा वानर आहे. त्याचा २६ वा वाढदिवस नुकताच झाला. ह्या गोरिलाचें वजन ४३५ पौंड असून त्याच्या पिंजऱ्यांत जाण्यास गेल्या वीस वर्षांत कोणीही धजावलेलें नाहीं. त्याची उंची सहा फूट असून हात आठ फुटापर्यंत लांब पोंचूं शकतो.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें पसिद्ध केलें